परिपत्रक क्र.३

माध्यमिक विद्यालयांना संलग्न असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयांच्या इ.१२ वी विनामोबदला उन्हाळी वर्गाबाबत :

# रयत शिक्षण संस्था,सातारा.

## कर्मवीर समाधी परिसर, सातारा.

माध्यमिक आस्थापना परीक्षा विभाग

परिपत्रक क्र. ३ दिनांक ५/४/२०१७

सर्व शाखाप्रमुख,
उच्च माध्यमिक विद्यालये, रयत शिक्षण संस्था,सातारा.
यांना ----------

संदर्भ :- १) संस्थेकडील दिनांक ४/४/२०१६ चे परिपत्रक क्र. २

१) उपरोक्त विषय संदर्भात संस्थेकडील वरील परिपत्रकांचे काळजीपूर्वक वाचन करावे.

२) मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी जा.क्र.उमा-२/ खाजगी शिकवणी / १३००२/ ११२/ दि.२९/३/९७ च्या पत्राने उन्हाळी वर्गाबाबत काही सूचना दिल्या आहेत. त्याचा विचार करून संस्थेने वरील संदर्भ क्र. १ या परिपत्रकाने आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

३) एखाद्या शाखाप्रमुखास असे उन्हाळी वर्ग सुरु करावयाचे असतील तर त्यांनी प्रथम असे उन्हाळी वर्ग सुरु करण्याचा प्रस्ताव आपल्या विभागाच्या मा.शिक्षण उपसंचालक यांचेकडे पाठवून सदर वर्ग सुरु करण्यास पूर्व परवानगी घ्यावी व नंतरच वर्ग सुरु करावेत.

४) ज्या शाखांना माध्यामिक विद्यालयांशी संलग्नित असलेल्या इ.१२ वीच्या वर्गाचे उन्हाळी वर्ग सुरु करावयाचे असतील त्यांनी खालील अटींचे पालन करूनच ते वर्ग सुरु करावेत.

   १. उन्हाळी अगर तत्सम स्वरूपाचे वर्ग चालविताना संबंधित विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचा मोबदला घेता येणार नाही.

   २. विद्यार्थ्यांची गुणवत्ता व शाखेचा निकाल सुधारण्यासाठी संबंधित शिक्षकांनी इ.१२ वीच्या उन्हाळी वर्गात विद्यार्थ्यांना विनामूल्य अध्यापन करावे.

५) शाखाप्रमुखांनी असे वर्ग शाखेत सुरु करण्यापूर्वी वर्गात दाखल होऊ इच्छिणारे विद्यार्थी, त्यांचे पालक आणि अध्यापनाचे काम करणारे शिक्षक यांची या संदर्भात कसलीही तक्रार नाही अशा आशयाचे संमतीपत्र देणे जरूर आहे. यासाठी सोबत नमुना पाठविला आहे तो तीन प्रतीत भरून त्याची एक प्रत मा.शिक्षण उपसंचालक व दुसरी प्रत संस्थेकडे पाठवावी व तिसरी प्रत शाखेच्या दप्तरी जपून ठेवावी.

६) तसेंच सदर वर्गाला लागणा-या स्टेशनरी खर्चासही मा.शिक्षण उपसंचालक यांची पूर्व परवानगी घ्यावी. त्याची एक प्रत संस्थेकडे पाठवावी.

७) सदरचे परिपत्रक **http://www.rayatshikshan.edu** या संस्था वेबसाईटवर माहितीसाठी व आपण आपल्या शाखेत करावयाच्या कार्यवाहीसाठी उपलब्ध आहे.

तेंव्हा आपल्या शाखेत इ.१२ वीचे उन्हाळी वर्ग घेणार असल्यास वरील सूचनांचे तंतोतंत पालन करावे व नंतरच वर्ग सुरु करावेत. सदर वर्गाबाबत खात्याकडे व संस्था कार्यालयाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार येऊ नये याची योग्य ती काळजी घ्यावी.

कळावे.

(प्रि. डॉ. डी.डी.पाटील)
सहसचिव(उ.शि.)
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :

(१) सर्व इन्स्पेक्टर्स, रयत शिक्षण संस्था, सातारा.

(२) ऑडिटर रयत शिक्षण संस्था, सातारा.

## 1) विद्यार्थी व पालक यांचेसाठी नमुना फॉर्म

शाखेचे नाव --------------------------------------------------------------- उन्हाळी वर्गांचा कालावधी-------------------------------

| अ.नं. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | उन्हाळी वर्गास मोबदला न देता स्वेच्छेने येत आहे- विद्यार्थ्यांची सही - | पाल्यास सदर वर्गास स्वेच्छेने पाठवीत आहे. असे हमीपत्र भरुन देणाऱ्या पालकाचे नाव | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1)<br>2)<br>3)<br>4) | | | | | | |

शाखाप्रमुखाची सही व शिक्का

## 2) शिक्षकांसाठी नमुना फॉर्म

शाखेचे नाव ---------------------------------------------------------------

| अ. नं. | शिक्षकाचे संपूर्ण नाव | अध्यापनाचा विषय व वर्ग | वर्गाचे काम विना मोबदला व स्वच्छेने करीत आहे. शिक्षकाची सही - | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1)<br>2)<br>3)<br>4) | | | | |

शाखाप्रमुखाची सही व शिक्का